स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम/माध्य.परीक्षा/ 3112
दिनांक - 01/02/2023

प्रति,

सर्व मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :- मार्च २०२३ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला अतिरिक्त गुण प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत..**

**संदर्भ :-** १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६ /प्र.क्र.२०२/ एस.डी.२ दि.२४/११/२०१७
२. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. डिओअे/ २०२२ /चार ५२४ दि.२९/१२/२०२२ चे पत्र
३. राज्यमंडळ, पुणे यांचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/ ०१९५ दि.११/०१/२०२३ चे पत्र
४. राज्यमंडळ, पुणे यांचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/ ४९२ दि.३१/०१/२०२३ चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय क्र.०१ च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभाग होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येतात.

कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्र क्र. ०२ अन्वये चित्रकला प्रस्ताव स्विकारण्याच्या मुदतीमध्ये वाढ करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव सादर करण्यास दि.३१/०१/२०२३ अशी मुदत देण्यात आलेली आहे.

तथापि काही तांत्रिक अडचणींमुळे निर्धारित करण्यात आलेल्या वाढीव मुदतीत माध्यमिक शाळांना अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव सादर करता येणार नसल्याने तसेच कोणताही पात्र विद्यार्थी अतिरिक्त गुणांपासून वंचित राहू नये म्हणून शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव **बुधवार दि.०८/०२/२०२३** अखेर माध्यमिक शाळांकडून स्विकाण्यात येणार आहेत. सदर प्रस्ताव विद्यार्थ्याचे बैठक क्रमांक शिवाय आवेदनपत्र क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे. सदरची मुदतवाढ अंतिम असेल यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत - शिक्षणाधिकारी -जिल्हा परिषद, सातारा/ सांगली / कोल्हापूर.

91 – d/khamkar sm 10th exam / 11th cet prakatan letter format